# लिपिक-टंकलेखक (मराठी/इंग्रजी)(मुख्य) परीक्षा- 2017

## जाहिरात क्रमांक-56/2017

## <u>घोषणा</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे "लिपिक-टंकलेखक (मराठी/इंग्रजी)(मुख्य) परीक्षा- 2017" या पदाच्या 495 (मराठी-456 व इंग्रजी-39) जागांसाठी दि.3 सप्टेंबर, 2017 रोजी मुख्य परीक्षा घेण्यात आली. प्रस्तुत परीक्षेसाठी संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेले दावे निकालासाठी विचारात घेऊन सदर दाव्यांच्या अनुषंगाने शिफारसपात्र उमेदवारांची पात्रता शासन स्तरावर, मूळ प्रमाणपत्रांआधारे तपासण्याच्या अधीन राहून, सदर परीक्षेचा निकाल दि. 18 एप्रिल, 2018 रोजी जाहीर करण्यात आला आहे.

2. सदर परीक्षेमधे **सांगली** येथील **श्री. थोरात उदय संजय (बैठक क्रमांक PN005196)** हे राज्यात प्रथम आले आहेत. मागासवर्गवारीतून **गोंदिया** येथील **श्री.चन्ने अरुण धनलाल (बैठक क्रमांक MB001336)** तसेच महिला वर्गवारीतून **अकोला** येथील **श्रीमती अली रुहिना निसार (बैठक क्रमांक NG001140)** ह्या प्रथम आल्या आहेत.

3. पूर्व परीक्षेच्या निकाला आधारे पात्र ठरलेल्या 6595 उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी प्रवेश देण्यात आला होता. प्रस्तुत निकाला आधारे 495 (मराठी-456 व इंग्रजी-39) उमेदवारांची शिफारस करण्यात येत आहे.

4. प्रस्तुत निकालाआधारे शिफारसपात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक 1 जुलै, 2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक 18 ऑगस्ट, 2016 रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-क पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा विहित दिनांकाचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल नियुक्ती प्राधिका-यांकडे नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहील .

5. प्रस्तुत परीक्षेच्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून 10 दिवसात, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमून्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्र. 3.8 पहावी)

**ठिकाण :** **मुंबई**

**दिनांक :** 18 एप्रिल, 2018

**सु. सं. केसरकर**
**उप सचिव (परीक्षा-2)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**